International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 8 Issue 11, November- 2018
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939 |

# वदर्भातील वनसंवर्धनात माध्यमांची भू मका - एक च कत्सक अध्ययन

राजेश रामपूरकर

## सारांश :

पर्यावरण आ ण पर्यावरणातील सर्व घटक हे भारतीय संस्कृतीचा भक्कम पाया आहे. भारतीय संस्कृतीत वनांना देवतेच्या रूपात बघितलं जातं. मानवी संस्कृती वन आ ण नद्यांच्या आधारावर वक सत झाली आहे हे आपण जाणतोच.अशा अनेक गोष्टीतून पर्यावरण आ ण मानवाचे संबंध वशद होते. या संशोधन लेखामध्ये वदर्भातील वनसंवर्धनात माध्यमांचे असलेल्या योगदानाचा च कत्सक अभ्यास करण्यात आलेला आहे.

मुख्य शब्द : पर्यावरण, भारतीय संस्कृती, मानव

## प्रस्तावना :

भारतीय संस्कृतीत वनांना देवतेच्या रूपात बघितलं जातं. मानवी संस्कृती वन आ ण नद्यांच्या आधारावर वक सत झाली आहे हे आपण जाणतोच. प्राचीन काळी वनदेवतेची पूजा केली जायची. आताही केली जाते. मात्र , औद्यो गकीकरण आ ण आधुनिकीकरणाच्या रेट्यात वृक्षदेवतेवर घाला घालण्यास मानवाने कमी केले नाही. आता वनाकडे व्यावहारिक दृष्टीने आ ण मानवाच्या निकड , गरजा, सोयी, सु वधा याचा आधार म्हणून बघितले जाते. पर्यावरणाचा समतोल हा वनसंपदेवर अवलंबून असल्याची जाणीव असूनही वकासाच्या नावाखाली मानवाने वनसंपदेची हेळसांड केली. याचे भयावह परिणाम २१ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच दिसायला लागले आहेत. पर्यावरण संतुलन बिघडल्याने जागतिक तापमानवाढीचा धोका वाढत असून ऋतूचक्रात वस्मयकारक बदल होत आहेत.

भारतीय आदिवासी समाज हा डोंगर , दऱ्यामध्ये पूर्वीपासून निवास करीत आहे. या परिवेशामुळे त्यांची समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था वनाधारित झालेली आहे.

मौर्य साम्राज्यात नैस र्गक संसाधनांना संरक्षण देऊन त्यांचा वापर आ ण हाताळणी यावर कडक निर्बंध लादले होते. आ ण त्यासाठी खास सक्षम अ धकाऱ्यांची निवड केली जात असे. या परंपरेतील सम्राट अशोकाच्या काळापासून (इ.स.पू. तिसरे शतक) यांनी वन्यजीव रक्षणाची जाणीव होती. या संदर्भात अतिशय स्पष्टपणे व वध प्रकारचे चतुष्पाद प्राणी, वटवाघळे, माकड, गेंडा, सा ळंदर, खारोट्या, व वध प्रकारचे पक्षी आदिची हत्या करू नये. या प्राण्यांचा अ धवास असलेली झाडे झूडपे तोडू नये , जंगलात वणवे लावू नयेत असे अनेक कडक नियम होते. हे सर्व नियम सम्राट अशोकाच्या प्र सद्ध ३० दगडी स्तंभापैकी पाचव्या स्तंभावर कोरलेली आढळतात. यानंतर अनेक राजे-महाराज्यांनी आपआपल्या परीने वन्यजीवांची काळजी घेण्यासाठी कायदे केल्याचे उदाहरणे आहेत.१ रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याचीही आज्ञा केल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे मनुष्य व प्राणी यांच्या औषधासाठी वनस्पतीची लागवड हाही त्यांच्या दूरदर्शीपणाचा एक नमुना आहे. २ त्यांच्या शलालेखांचा वचार करताना पर्यावरणांच्या वकासासाठी आपण राबवत असलेले प्रकल्प पाहता त्यांची आजही आपल्याला गरज आहे असे वाटते. म्हणजेच वनसंवर्धन व पर्यावरण मानवाच्या जीवनासाठी (आरोग्य , मनोरंजन, अन्नधान्य, निवारा, इंधन) निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी (पाऊसपाणी, तापमान, संतुलन, अन्नसाखळी) तसेच ज मनीची सुपीकता , ओसाडपणापासून ज मनीची बचाव, पकावरील रोग, अन्नधान्याची शुद्धता ठेवण्यासाठी पर्यावरणाची आवश्यकता आहे.

सम्राट अशोकांनी आपल्या गरनारच्या पहिल्या शलालेखामध्ये प्रा णहिंसा करू नये अशी आज्ञा केली होती. त्यांच्या काळात अनेक प्रकारच्या प्राण्यांची शकार केली जात होती , परंतु त्यांनी यावर बंदी घातली होती. आजही या आज्ञेची गरज आहे. माणूस स्वत:चे पोट भरण्यासाठी , स्वत:चे रोग बरे करण्यासाठी कंवा मनोरंजनाचे साधन म्हणूनही असंख्य प्राणी व पक्षी मारत असतो. या हत्येमुळे क्रौर्य व तिरस्कार वाढत होते. तेव्हा सम्राट अशोकांनीही आपल्या काळात अशा गोष्टींना आळा बसावा म्हणून अनेक नियम सां गतले होते. ते नियम आजही महत्त्वाचे आहेत. त्यामध्ये काही महत्त्वाचे नियम म्हणजे जंगलांना आगी लावू नयेत , प्राण्यांची सहा महीण्याच्या आतील बछडयांना मारू नयेत, पल्लांना दुध पाजणाऱ्या प्राणी-मात्रांना मारू नये, मधासाठी पोळ्यांना आगी लावू नयेत.३
मानव वन्यजीव शतकानुशतके पृथ्वीतलावर गुण्यागों वदाने नांदत होते. परंतु, गेल्या दोन ते तीन शतकांत माणसाने वन्यजीवांची प्रमाणाबाहेर शकार केली. अन्नासाठी आ ण अगदी त्यांचे नैस र्गक अ धवास बळकावण्यासाठी माणूस त्यांच्याशी स्पर्धा करू लागला. अत्याधुनिक तंत्रांचा वापर करून अवैध मार्गानी शकार करणे , तस्करी करणे, त्याचप्रमाणे हवा पाणी , जमीन या नैस र्गक घटकांची कमालीचे प्रदूषण हे देखील प्रत्यक्ष कंवा अप्रत्यक्षपणे वन्यजीवांच्या नाशास कारणीभूत ठरत आहे. सम्राट अशोकानी या सर्व गोष्टीचे आपल्या शलालेखात सजीवांच्या बाबतीत जे वचार मांडले त्यांची आजच्या काळातही गरज आहे.
वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळ वती ॥
या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे वनांचे संगोपन आ ण ईश्वयराची आराधना या बाबी मानवाला सुखाकडे नेणाऱ्या ठरतील. आपल्या सदभक्तीने जोपासलेला हा वश्वा.स वनसंपदेच्या वृध्दीने सार्थ ठरवू या ४.
छत्रपती शवाजी महाराजांनी आपल्या आज्ञापत्रात मनुष्यप्राण्यांसाठी वनसंपदेचे महत्त्व कती मोठे आहे , हे नमूद करून ठेवले आहे. छत्रपती शवाजी महाराज हे द्रष्टे पुरुष होते. त्यांच्या स्वराज्य नि र्मतीच्या प्रयत्नांना मावळ्यांसोबतच सह्याद्रीतील घनदाट अरण्ये , डोंगर, नद्या या नैस र्गक संपदेचा कती मोठा हातभार लागला हे आपण सारेच जाणतो. प्रगती आ ण वकासाची उंच भरारी घ्यायची असेल तर निसर्गाचे पाठबळ हवेच , हे त्या द्रष्ट्या पुरुषाने ओळखले होते. त्यांचाच आदर्श ठेवून आजच्या काळात वनसंपदेला जुने वैभव मळवून देणे हे आपले कर्तव्य ठरते.

## १.२ शवरायांचे वनव्यवस्थापन व वनसंवर्धन :

वनस्पती आ ण मानव यांचे एकमेकांशी असणारे नाते शवरायांनी ओळखले होते. शवरायांच्या संघर्षमय जीवनातदेखील पर्यावरणाचे संतुलन ठेवणारी वनश्री त्यांच्या नजरेआड झाली नाही. त्याकाळची वनराई ही भरमसाट असूनही त्याचा ऱ्हास शवरायांनी कधीच होऊ दिला नाही. प्रत्येक गडावर व गड परिसरात शवरायांनी आंबा , वड, नारळ, शसव, बाभूळ, ऐन यांची लागवड केली होती.
आरमारासाठी साग व शसची झाडे वापरली जात असत. फळ-फळावळांसाठी आंबा, चकू, फणस आदी झाडे, इतकेच नव्हे तर संदेशवहनासाठी काळा धूर व पांढरा धूर सोडणारी झाडेही शवरायांनी खास लावली होती व त्यांचा उपयोग त्याप्रमाणे करूनही घेतला होता.
आज्ञापत्रात शवरायांनी निसर्गसंवर्धनाबाबत कती जागरूक होते , याचा प्रत्यय येतो. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये, अशी सक्त ताकीद शवरायांची होती. अगदी गरज पडल्यास शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देऊन झाडे खरीदी करावी, रयतेस त्रास होईल अशी कृती करु नये. आंबा. साग ही झाडे लेकरांसारखी वाढवली. मात्र , सैनिकांनी बळजबरीने तोडल्यास त्यांच्या दु:खास पारावर राहत नसे. इतके पर्यावरण व संवर्धनाबाबतीतले स्पष्ट वचार पाहून हा राजा जनतेचा कती वचार करत होता, हे अधोरे खत होते.

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 8 Issue 11, November- 2018
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939 |

प्राचीन काळापासूनच मानव वनांचे लाभ घेत आला आहे. त्यासोबतच वनसंवर्धनही करीत आलेला आहे. असे संबध अनेक वर्षे कायम राहिले. १७ व्या शतकात झालेल्या औद्यो गक क्रांतीनंतर मानवी प्रवृत्तीमध्ये बदल झाला. मानव आपल्या स्वार्थासाठी वनांचे दोहन करीत राहिला. वन संवर्धनासाठी कोणतेही सकारात्मक प्रयत्न केले नाहीत. परिणामी वनांचा ऱ्हास होत गेला. राष्ट्रीय आ ण आंतरराष्ट्रीय स्तरावर अतिशय गांभीर्याने या  वषयाकडे बघितले गेले. अनेक बैठका, सभा, चर्चासत्रे झालीत. अनेक करार अस्तित्वात आलेत.  वकासाच्या नावाखाली मानवी हस्तक्षेप वाढल्याने जैव व वधतेचा ऱ्हास , हवामान बदल , जागतिक तापमानवाढ यासारख्या  वश्वरव्यापी समस्या निर्माण झाल्यात. परिणामी,  वक सत व अ वकसनशील राष्ट्रांनी हवामान बदल्याच्या समस्येवर प्रयत्न केलेत.

## १.३ इंग्रजांचे वनसंवर्धनातील योगदान

 शवाजी महाराजांच्या काळातच इंग्रजांनी भारतात पाय रोवणे सुरु केले होते. त्यानंतर आलेल्या राज्यांनी  शवाजी महाराजांचा आदर्श ठेवत वनसंवर्धनावर लक्ष केंद्रीत केले. १८७९ साली इंग्रजांनी राखीव वनाचे क्षेत्र निश्चिमत करुन ब्लॉकमध्ये वर्गीकृत केले. (उदा. केळझर ब्लॉक) आजुबाजुच्या भागाचे परिसरानुसार नावे देण्यात आली. त्यावेळीच वनाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने टाकलेली ही सकारात्मक पावले होती. त्यानंतर १९३४ साली त्या ब्लॉकमध्ये पुन्हा  वभाजन करुन (कम्पाटमेन्ट) कक्ष केले. नंतर १९५३-५५ च्या दरम्यान, जमीनदारी प्रथेचे उच्चाटन (abolition of property right act) सी.पी. अॅण्ड बेरार सरकारमध्ये शासनाने जमीनदाराकडील जास्तीच्या पडीत जमीनी ताब्यात घेतल्या.

 शवाजी महाराजांनी जसे काही वृक्षांच्या तोडीवर बंदी घातली होती. त्याच प्रमाणे १८९५ या दरम्यान, वृक्षांच्या काही प्रजाती जसे साग, हलदू, बिजा आदी केवळ परवाना असणाऱ्यांना तोडता येत होते. आवळा , बोर, मोहा,  चंच ही फळ झाडे यांना तोडण्याच मनाई होती. यानंतर पहिली कार्य आयोजना ज्या भागात जो अ धकारी असेल त्याच्या नावाने ओळखला जाऊ लागला (उदा वर्धा जिल्ह्याचा कार्य आयोजना आराखडा डॉब्ज) या इंग्रज अ धकाऱ्यांनी १८९५ - १९१२ या कालावधीसाठी तयार केला. तेव्हा नागपूर वर्धा जिल्ह्यात समा वष्ट होता. यामध्ये सुधारणा तोड पद्धती (impromentfeling) नंतर १९०६-१९०७ दरम्यान , उच्चाप्रतिचे वृक्षांसह फुटवे पद्धती अवलंबण्यात आली आहे. या योजनेमध्ये  वशेष बाबी समा वष्ट नव्हत्या. यानंतर १९१३-३४ या काळासाठी डनबर्स या अ धकाऱ्यांनी तयार केलेली कार्य आयोजना अस्तित्वात आली. यामध्ये साधारण फुटवा पद्धती व मुखतोडीनंतर १०   , २० आ ण ३० वर्षानंतर  वरळणीची कामे करण्यात येत होती. १९३४-४७ सालासाठी श्री. सँग्रीया , भारत स्वातंत्र झाल्यानंतर १९४७-१९६५ श्री आर.  मश्रा या  वभा गय वना धकाऱ्यांनी कार्य आयोजनाचा आराखडा तयार केला. दरम्यान , काही जमीनीचे १९५५ साली संरक्षीत वन ( protected forest) म्हणून अ धघो षत केले. जमीनदाराकडील जमा केलेल्या उर्वरीत जमीनीना झुडपी जंगलाचा दर्जा देण्यात आला. राज्य सरकारने कार्य आयोजना  वभागाच्या माध्यमातून वनांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्यात येतो. हा आराखडा दहा वर्षांचा असतो. त्यानुसार १९६० पासून राज्यात वन संवर्धन व वृक्षतोड  , लागवडीची कार्यआयोजना तयार केली जातो. त्यानुसार वनसंवर्धनाची कामे करण्यात येत आहे. त्यानुसार वनसंवर्धन, वृक्षतोड, लागवड करावी लागते.

##  वषयांची व्याप्ती

जगभरात देशातील आ ण महाराष्ट्रातील घडामोडीसाठी माध्यमे हा लोकांसमोरचा मोठे पर्याय आहे. या वषयी घेण्यात आलेल्या  व वध सर्वेक्षणातून हे  सद्ध झाले आहे. ८० टक्के व्यक्तींना दुर चत्रवाणीतून , ५० टक्के व्यक्तींना वृत्तपत्रातून आ ण २० टक्के व्यक्तींना इंटरनेटद्वारे तर १८ टक्के व्यक्तींना रे डओद्वारे ही माहिती कळते. भारतीय मुद्रितमाध्यमे वन संवर्धन आ ण पर्यावरण वषयक बातम्यांना केवळ १.५ टक्के इतके नगण्य स्थान देतात,

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 8 Issue 11, November- 2018
ISSN(o): 2249-7382 | Impact Factor: 6.939 |

प्रादे शक प्रसार माध्यमांमध्ये हे स्थान याहूनही कमी आहे. लोक प्रय वषयांच्या तुलनेत वनसंवर्धनाच्या बातम्यांकडे दुर्लक्ष केले जाते. अशा वार्तांकनाला प्रोत्साहन देण्याचे फारसे प्रयत्न होत नाही. वनसंवर्धनाला वाहिलेले साप्ताहिक आ ण मा सक कोणतेही नाही. दैनिक तरच नाहीच. काही स्वयंसेवी संस्था आपल्या कामाची माहिती व इतर वनसंवर्धनाची माहिती देण्यासाठी बुकलेट प्रका शत करीत असतात. माध्यमे शासन , जनता, स्वयंसेवी संस्था यांच्यामधला दुवा म्हणून वन व वन्यजीव संवर्धनासाठी काम करु शकतात.

## वनसंवर्धनात पत्रकाराची भु मका

महाराष्ट्रामध्ये वदर्भातील चंद्रपूर , गड चरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, यवतमाळ, वर्धा या जिल्हयांमध्ये जंगल अतिशय घनदाट कंवा मध्यम प्रतिचे आहे. या जंगलामध्ये मोठया प्रमाणात वन्य प्राणी , दु र्मळ पक्षी, झाडे आहेत. त्याचे संवर्धन त्या परिसरातील नागरिकांनी व स्थानिकांनी केलेले आहे. हे करीत असतांना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. हे जरी सत्य असले तरी या जंगलाचे संवर्धन करण्यासाठी वदर्भातील माध्यमांनी व पत्रकारांनी अतिशय मोलाची भु मका पार पाडलेली आहे.

वनसंवर्धन हे अपघाताने माध्यमांमध्ये कसे आले हे अतिशय मनोरंजकच आहे. ते कसे आले ? १५ ते २० वर्षा पूर्वी छाया चत्रकार वन्यजिव क्षेत्रामध्ये अथवा जंगलात भटकंतीकरीता जात असत. त्यात काही निसर्गप्रेमी , जीवशास्त्रज्ञ तर काही भौगोलीक अभ्यासकांचा समावेश होता. त्यानंतर हौशी छाया चत्रकारही जंगलात जावू लागले. तेव्हा सोशल मडीया, सारखी माध्यमे नव्हती , त्यामुळे छाया चत्रकारांना वाघासह इतर वन्य प्राण्यांचे काढलेले छाया चत्रे वृत्तपत्रात प्रकाशीत करण्यासाठी पत्रकारांशी संपर्क करीत असे. पत्रकारही त्या वन्यजीवांच्या छाया चत्रांना चांगली प्र सध्दी देवू लागले. त्यामुळे वाचकांमध्येही वन्यप्राण्यांबददल आकर्षण निर्माण झले. त्यातुन ते जंगलभ्रमंती करु लागले. त्यातील काही छाया चत्रकार व वाचक वन्यजीवप्रेमी म्हणून पुढे आले. त्यातुनच ते वन्यजीव संवर्धनाकडे वळले. हळुहळू घटनेवर आधारीत बातम्या माध्यमांमध्ये येवू लागल्या. त्यात वन्यजीवाने मानवावर केलेला हल्ला , वन्यजीवासह वाघाचे जंगलात झालेले दर्शन , वाघ, बिबट, अस्वल, गवा आदी प्राण्यांच्या मृत्यूच्या बातम्या अथवा अपघातात जखमी झालेल्या बातम्या येवू लागल्या. त्यातुन वनसंवर्धन हा वषय सर्वसामान्यामध्ये पोहचला.

## वनसंवर्धन व पर्यावरण पत्रकारितेचे प्रश्ना

पत्रकारांना धारणक्षमता , जैव व वधता, पाणी, जंगल, जमीन, वन्यजीव, हवांमान बदल , प्रदुषण, कृषी, लोकसंख्या, नागरिकरण, आरोग्य अशा व वधांगी वषयांमधून पर्यावरण व वनसंवर्धन पत्रकारिता करता येते. जगभरात या प्रश्नाण वषयी व वध संस्था, गैरसरकारी संघटना आंदोलन करीत असतात. वनसंवर्धनाचे प्रश्नय लोकांसमोर मांडत असतात. या वषयावर अनेक संशोधक संशोधनही करतात. जगभरात दरवर्षी अशुद्ध पाण्यामुळे वाढणारी रोगराई , त्यामुळे होणारे मृत्यू, पर्यावरणातील बदलामुळे निसर्गचक्रात होत असलेली व वधता, घनकचरा, ई कचऱ्यामुळे उद्भवत असलेल्या समस्या, वाढती लोकसंख्या, नागरिकरणामुळे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रश्नढ़ वन्यजीवांची होत असलेली शकार, जैव व वधतेचा र्हा स, व वध देशात याबाबत घडणार्याढ घटना, चर्चा व वध परिषदा, समस्यांचे समाधान या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. महाराष्ट्रातील एखाद्या खेड्यातील समस्या ही जगभरासाठी समस्या ठरु शकते. म्हणून प्रत्येक समस्यांकडे तितक्याच गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

## महाराष्ट्रातील वनांची स्थिती व पार्श्वcभूमी :

महाराष्ट्र राज्याचे एकूण भौगो लक वनक्षेत्र ३ लाख ०७ हजार ७३१ चौरस कलो मटर आहे. त्यामध्ये वनक्षेत्र ६१ हजार ८५०.९० चौरस कलो मटर असून त्याचीं टक्केवारी २०.१० टक्के आहे. राष्ट्रिय वन धोरण १९८८ व २००९ च्या महाराष्ट्र वन धोरणानुसार राज्यातील एकूण भौगो लक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असायला हवे. त्यासाठी राज्य शासनाचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## संदर्भ सूची

(National Parks and Sanctuaries in Maharashtra Reference Guide Volume I, Bombay Natural History Society, 2005)

-Ghate R. 2000, "Joint Forest Management : Constituting new Commons, a Case Study of Maharashtra"

N.C.Saxena, 1976"joint forest Management a New Development Band-Wagon in India"

Rout Satyapriya, 2002, Joint Forest Management in Orissa Challenges and Opportunities :

## संदर्भ

1) Alston, Margret and Bowies, Wendy (2003) Reasearch for Social Jaipu : RawatPublicaton

2) Rubin Allen and Eari (2011) Methodology for Social Work Reasearch (INDIN EDITION) Jaipur : Rawat Publication

3) Lal Das, D.K. And Bhaskarn, Vanika (2008) Reasearch Methodology for Social Work, Jipur, Rawat Publication

4) आहूजा, राम. (2003). सामाजिक सर्वेक्षण एवं अनुसंधान. जयपूरः रावत पब्लीकेशन.

5) काचोळे, दा. धे. (1993). सामाजिक संशोधन पध्दती. औरंगाबादः कैलाश पब्लीकेशन.

6) मेश्राम, सुरेश. (2007). प्रात्य क्षक सामाजिक संशोधन. नागपूरः कृष्णचंद्र एजन्सीज.

7) पाटील वा. भा. (1998). संशोधन पद्धती, नागपूरः श्री मंगेश प्रकाशन.